# महाराष्ट्रपरावैद्यकीयपरिषद,मुंबई

शासकीय दंतमहाविद्यालय व रुग्णालयइमारतचौथामजला,सेंटजॉर्जेसरुग्णालयआवार,
पी.डीमेलोरोड,फोर्ट,मुंबई -400 001दुरध्वनी क्र.91-22-22620360
ई-मेलआयडी -mpmcmumbai2017@gmail.com
वेबसाईट -www.maharashtraparamedicalcouncil.org

क्र.मपवैप/ एम सी व्हि सी /97 अ /2020 दिनांक.09.09.2020

## MCVC नोंदणी सुरु करण्या बाबत ठरावः-

विषय:- एम सी व्हि सी पात्रता धारकांची नोंदणी सुरु करण्या बाबत.

संदर्भ:- 1) दिनांक.08.01.2020 चे एम एल टी पी संघटनेचे पत्र व याचिका क्रमांक.1905/19 दि.02.05.2019 एम एल टी पी संघटना विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर.
2) दिनांक.09.01.2020 रोजी चे इतिवृत्त.
3) दिनांक. 11.02.2020 रोजी चे इतिवृत्त.
4) दिनांक. 04.03.2020 रोजी चे इतिवृत्त.
5) दिनांक. 14.08.2020 रोजी ची व्हिडिओ कॉन्फरंस बैठक.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकीत विषया नुसार दि.13.11.2019 रोजी महाराष्ट्र परावैद्यक परिषदेची सुधारीत अनुसूची प्रसिध्द झाली आहे. त्यामधे इतर अभ्यासक्रमा सोबत एम सी व्हि सी या पात्रतेचा समावेश करण्यात आला आहे.परंतु अद्याप आपल्या परिषदे कडून नोंदणी प्रमाण पत्राचे वाटप करण्यात आले नसल्यामुळे एम एल टी पी संघटनेने नोंदणी सूरु करणे बाबत वारंवार विचारणा होत आहे तसेच त्यांची उपरोक्त संदर्भांकीत क्र.1 नुसार कोर्ट केस प्रलंबीत आहे.

या संदर्भात ठराव करण्यासाठीचा हा विषय आपल्या परिषदेच्या दि.09.01.2020 रोजी बैठकीमधे ठेवण्यात आला होता त्यानुसार

**मुद्दाक्र.**1). MCVC बाबत ज्यांच्याकडे एक वर्ष प्रशिक्षु प्रशिक्षण (Apprentinship) पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मानव संसाधन मंत्रालय यांचे आहे त्यांनाच नोंदणी द्यावी अथवा सर्वांना नोंदणी द्यावी याबाबत चर्चा करण्यात आली व हा विषय न्यायप्रविष्ट असल्यामुळे योग्य तो पत्र व्यवहार करुन निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले.त्यानंतर तश्या प्रकारचा पत्र व्यवहार संचालनालय व वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन ,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,तसेच MCVC कार्यालय या ठीकाणी पत्र व्यावहार करण्यात आला परंतु अद्याप प्रतीसाद प्रलंबीत आहे.

त्या नंतर दि. 11.02.2020 रोजी च्या बैठकीमधे हा विषय पुन्हा ठेवण्यात आला व मत घेण्यात आली त्याचा तपशील खालील प्रमाणे.

**मुद्दाक्र.9).** एम सी व्हीसी पात्रता असलेले व ज्यांनी मानव संसाधनची एपरेंटिशिप प्रमाणपत्र प्राप्त आहेत त्यांनाच परावैद्यक व्यावसायिक व्यक्ती म्हणुन रजिस्ट्रेशन देण्याबाबत एफीडेवीट सादरकरुन सुरुवात करण्यात यावी ठरले. (2 मते - नाही, बाकीसर्व - हो).

त्या नंतर दि. 04.0302020रोजी च्या बैठकीमधे कोर्ट एफिडेविट तयार झाले असल्यास एम.सी.व्ही.सी रजिस्ट्रेशन सुरू करणे बाबत चर्चा करण्यात आली व दि. 12.03.2020 ला कोर्टकेस असल्यामुळे हायकोर्टमध्ये वकिलांची भेट घेवून योग्यती कागदपत्रे देवून एफिडेविट तयार करुन सादर करावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले.परंतु एफिडेविट तयार करण्याकरता वकिलांना भेटण्यासाठी अध्यक्ष/उपाध्यक्ष किंवा सदस्य यांन पैकी कोणिही येउन चौकशी व एफिडेवित तयार करुन द्यावे असे वकिलांचे म्हणने आहे.पुढील कोर्ट केस तारीख दि.10.09.2020 असुन लॉक डाउन मुळे पुढे जाण्याची शक्यता आहे तरी त्या पुर्वी त्या बाबत एफिडेविट तयार होणे अपेक्षित असल्यामुळे या बाबतचे म्हणेने दि.14.08.2020 रोजीच्या व्हिडिओ कॉन्फरंस मिटींग मधे माडण्यात आले त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

एम सी व्हि सी परावैद्यक विषय घेउन 12 वी पास करणाऱ्यांची उच्च माध्यमीक प्रमाणपत्र शैक्षणीक पात्रता ठरत असून त्या व्यतिरिक्त मानव संसाधन विकास मंत्रालय यांचे एक वर्ष प्रशिक्षु प्रशिक्षण (Apprenticeship) प्रमाणपत्र असल्यावर ती शैक्षणीक पात्रता परावैद्यक व्यवसायीक व्यक्ती म्हणून नोंदणी देण्याबाबत परीपूर्ण ठरते.

वरिल प्रमाणे कायदेशिर बाबींच्या पुर्ततेबाबत चर्चा व ठराव बैठकीमधे करण्यात आला तसेच हा विषय न्यायप्रविष्ट असल्यामुळे वरिल संघटनेने महाराट्र शासन व इतर यांच्या विरुध्द एक याचिका (क्रमांक.1905/19 दि.02.05.2019.) हाय कोर्टा मध्ये दाखल केली आहे. त्या मुळे एम सी व्हि सी या पात्रतेचा समावेश महाराष्ट्र परावैद्यक परिषदेच्या सुधारित अनुसूची मध्ये करण्यात येऊनही याचिके मधील मुद्दा क्र. 09 नुसार हायकोर्टाचा निर्णयाच्या अधिन राहून त्या नंतरच ए म सी व्हि सी शैक्षणीक पात्रता धारकांना परावैद्यक व्यवसायी व्यक्ती म्हणून नोंदणी देण्यात यावी असे ठरविण्यात आले.

(श्रीमती.दिशा गुडूळकर)
प्रबंधक
महाराष्ट्र परावैद्यक परिषद.